Rotary Club of Pune Katraj

# DARPAN

Rotary Dist. 3131
Club No. 31609

President : **Rtn. Milind Kulkarni** 94220 89888
Secretary : **Rtn. Asmita Patil** 98501 22383
Editor : **PP Vibhakar Ramtirthkar** 93710 01906

**Issue 8** **Date 29 February 2024**

## Rotary Designated Month – Peace Building & Conflict Resolution Month




Millions of people all over the world are currently displaced by armed conflict or persecution. In fact, 90% of casualties in armed conflicts are civilians, half of which are children. Through service projects and Rotary programs, the Rotary family is committed to pursuing projects that address the structural causes of conflict, including poverty, inequality, ethnic tension, lack of access to education, and unequal distribution of resources.....




Rotarians train adults and young leaders to prevent and mediate conflict, and aid refugees who have fled dangerous areas. During February, Rotary Peace Building and Conflict Prevention Month, we're celebrating our commitment to build peace and mitigate conflict.

**February 23, Rotary's 115th Birthday is also World Understand and Peace Day.**

## Message by RI President R. Gordon R. McInally for February 24



I am enthused and encouraged by your embrace of mental health initiatives throughout the Rotary world. More than 1,000 of you have responded so far to an ongoing survey by the Rotary Action Group on Mental Health Initiatives, offering your feedback on what Rotary can do to improve the personal well-being of members.

The top suggestions are illuminating. Rotary members are asking for more fellowship, camaraderie, conversation, cohesiveness, and connection. They also want more recognition, validation, and integration. They are seeking more service opportunities, and they want more wellness activities, including mental health speakers, awareness efforts, and education.

Our members not only appreciate the greater focus on mental health, but they also believe that making more of the Rotary experience will materially improve their lives. I find it interesting that members are not asking anything dramatically new of their club — rather they want more of what we do best. For example, connection can be improved during meetings simply by assigning seating once each month to encourage people to speak with someone new.


Here are some great ways that we can help achieve these results and make Rotary more appealing to those considering membership. First, we need to acknowledge the importance of increasing belonging in our clubs and to encourage Rotary members to make the most of every opportunity for new and stronger connections. Public health experts worldwide are concerned about increasing levels of loneliness — the U.S. surgeon general has even declared it an epidemic. Mental health experts agree that finding groups and clubs around common hobbies and interests is a strong way to create greater connectedness. This is what Rotary is all about. We need to make sure all of our members are fully engaged and that our communities are better aware of this inherent strength.

Second, if your club has found new ways to build connection, please share your stories with us at mindhealth@rotary.org so we can make them more broadly known within the Rotary world. Your good ideas might inspire others. Post your service project stories on Rotary Showcase.

And finally, I encourage you to share feedback from surveys like this with your club and bring forward your own ideas to improve your club experience and meet your peers' expectations. The journey we have begun is about more than mental health. It is about taking advantage of the full strength of our wonderful organization and helping all members feel that they are part of a community that cares deeply about their personal well-being.

Everything you do to strengthen connections in Rotary, with each other and the people we serve, also helps improve mental health. And everything we do to improve mental health helps strengthen those connections. Let's continue this virtuous cycle.

## संपादकीय – संपादक माजी अध्यक्ष विभाकर रामतीर्थकर



February is the month of Shri Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti. Shivaji Maharaj has occupied our lives even now and will occupy our lives for centuries to come. He is an excellent example of how to manage, grow and that too with principles. His approach to women, farmers and overall subjects is exemplary. Everybody cannot be Shivaji, but everyone can at least keep Shivaji as his role model in his behaviour. These days we do have many facilities. But in his life, Shivaji had all adversaries. Shivaji lived a king's life, not that of Sultan. Consider for example, that I get one day to be a king. What would I do? This was my favourite essay in my school days. Now we are grown up. We can write in a mature, great way. Let us pen down just a few points, what would I do if I was Shivaji. Even if we practice that in our day-to-day life, we will feel proud about ourselves. Just try!

## अध्यक्षीय मनोगत – अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी



जानेवारी महिना संपत असताना वेध लागले होते. रोटरी वर्षातील सर्वात महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे प्रांतपाल मंजू फडके यांची क्लबला भेट. ३ फेब्रुवारी रोजी डॉ शुभदा जठार यांचे महिलांचे आरोग्य या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. क्लब मधील जेंट्स भिशी ग्रुपची पिकनिक असल्याने PP नमिता यांनी अध्यक्ष पदाची जबाबदारी सांभाळली. ८ फेब्रुवारी रोजी PYC डेक्कन जिमखाना येथे डिजी व्हिजिटचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. या कार्यक्रमात सुरवातीला स्ट्रॅटेजिक कमिटी सोबत डिजी मंजू यांनी संवाद साधला. यानंतर संचालक मंडळाच्या बैठकीत डिजी मंजू यांनी विशेष मार्गदर्शन केले. रोट्रॅक्ट क्लब सोबतच्या मिटींग मध्ये डिजी मंजू यांनी रोट्रॅक्टर करीत असलेल्या कामाबद्दल कौतुक केले. यानंतर सर्व क्लब सभासदांसमोर डिजी मंजू यांनी रोटरीचे महत्व, समाजातील स्थान, आपली समाजाप्रती असलेली सामाजिक बांधिलकी यांचे विस्तृत विवेचन केले. डिजी मंजू यांची ओळख रो वर्षा हिरवे यांनी आपल्या अनोख्या शैलीत कवितेच्या माध्यमातून सादर केली. ही ओळख डिजी मंजू यांना खुप आवडली असल्याचे त्यांनी नमूद केले. रो दिलीप आणि ॲन पद्मा पंडित यांनी दिलेल्या शाही फेलोशिपचा आस्वाद सगळ्यानी घेतला. १६ तारखेला व्हॅलेंटाईन डे सेलेब्रेशन करण्यात आले. या कार्यक्रमात कपल गेम्स घेण्यात आले आणि विजेत्या स्पर्धकांना बक्षिसे देण्यात आली. २४ फेब्रुवारी रोजी DRT मिटिंगच्या अंतर्गत तंबोला हा कार्यक्रम घेण्यात आला होता. या कार्यक्रमात रो नाना पाटील आणि रो अभय सोनटक्के यांनी रोटरीवरील माहितीवर आधारित तंबोला कार्यक्रम घेतला. तंबोलाची मजा सगळ्या सभासदांनी खेळीमेळीने सहभाग घेत लुटली.

## फर्स्ट लेडी मनोगत – मुग्धा कुलकर्णी



फेब्रुवारी महिना अगदी गडबडीचा, उत्साहाचा असा साजरा झाला. महिलांच्या आरोग्याबाबत डॉक्टर शुभदा जठार यांनी दिलेल्या टिप्स, तसेच D.G. visit ची लगबग आणि अत्यंत दिमाखात, आनंदात पार पडलेला D.G.Visit कार्यक्रम म्हणजे आता पर्यंत केलेल्या कामाची स्वप्नपूर्तीच जणू! खेळीमेळीच्या वातावरणात साजरा झालेला व्हॅलेंटाईन डे आणि DRT मिटिंगमध्ये घेतलेला तंबोला हे या महिन्यातील मानबिंदूच. सर्वांच्या सहकार्याने आणि सहभागाने आठ महिन्यांचा टप्पा पार केला. आता पुढील अनेकानेक कार्यक्रमांच्या प्रतीक्षेत...






# Review of Weekly Meetings

## 3 Feb – Health care after 40 age



दि. ३ फेब्रुवारीच्या साप्ताहिक सभेत सचिव अस्मिता पाटील यांच्या नियोजनातून महिलांसाठी आरोग्याची काळजी कशी घ्यावी याबद्दल रो. डॉ. शुभदा जठार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या दिवशी पुरुष सभासदाची सहल असल्याने IPP नमिता नाईक यांनी अध्यक्षपदाची सूत्रे सांभाळली. डॉ शुभदा यांची ओळख रो अंजली हूगे यांनी करुन दिली. डॉ शुभदा यांनी आपल्या भाषणात स्त्रियांनी आपल्या आरोग्याची घ्यावयाची काळजी याबद्दल सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाच्या शेवटी ॲन पुष्पा यांनी आभार प्रदर्शन केले. रो सुजाता हाटकर यांच्या फेलोशिपचा आस्वाद घेत सभेची सांगता झाली.

## 8 Feb – District Governor Visit




रोटरीच्या प्रथेप्रमाणे क्लबला डिस्ट्रिक्ट गव्हर्नर यांची भेट ही वर्षभरातील महत्वाची मिटिंग असते. यावर्षी डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू फडके यांची भेट क्लबच्या सभासदांसोबत खूप उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. सुरवातीला डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू यांचे स्वागत First Lady मुग्धा यांनी पुष्पगुच्छ आणि चॉकलेट देऊन केले. Strategic Planning committee च्या मिटिंगमध्ये सर्व सभासदांनी आपापली ध्येय, धोरणे आणि उद्दिष्टे विषद केली. यानंतर डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू यांनी सर्व विषयांवर मार्गदर्शन केले. पुढील भागात BODच्या सभासदांसोबत मिटिंग झाली. या सभेत सर्व संचालक मंडळाने आपापल्या पोर्टफोलिओमधील झालेल्या कामांची माहिती दिली आणि पुढील काळात करावयाची कामे यांचा आढावा घेतला. यानंतर डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू यांनी क्लबच्या सभासदांना मार्गदर्शन केले. यावर्षीच्या डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू यांच्या Star Galaxy theme नुसार आकर्षकरित्या सजवलेल्या दालनात First Lady मुग्धाच्या हस्ते डिस्ट्रिक्ट गव्हर्नर मंजू यांचे sashe व crown परिधान करून स्वागत करण्यात आले. मोबाईल फोनच्या टॉर्चच्या उजेडात (waves चा अनुभव देत) अनोख्या पध्दतीने त्यांना सभास्थानी आणण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात नेहमीप्रमाणे राष्ट्रगीत आणि Four Way test यांनी झाली. ॲन पल्लवी नेरुरकर यांच्या ईशस्तवनाने कार्यक्रम वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवला. MOC पुष्कराज यांनी आपल्या खुमासदार शैलीत संपूर्ण सभेचे सुत्रसंचालन केले. डिस्ट्रिक्टमधील आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. सचिव अस्मिता यांनी रोटरी इन्फॉर्मेशन आणि क्लबच्या जानेवारी अखेरपर्यंत झालेल्या सर्व मिटिंगची विस्तृत माहिती दिली. यानंतर अध्यक्ष मिलिंद कुलकर्णी यांनी जानेवारी अखेरपर्यंत प्रत्येक पोर्टफोलिओमधील झालेल्या कामांची माहिती आली. AG सचिन देशपांडे यांनी क्लबचे सर्व कामाबद्दल कौतुक आणि समाधान व्यक्त केले. रो वर्षा हिरवे यांनी आपल्या अनोख्या शैलीने कवितेच्या माध्यमातून डिजी मंजू यांची ओळख करून दिली. DG मंजू फडके यांनी आपल्या भाषणात रोटेरिअन असल्याचे फायदे उदाहरणांसह सांगितले. तसेच रोटरी फौंडेशनच्या मदतीने करत असलेल्या कामाबद्दल विस्तृत माहिती दिली. आपल्या ओघावत्या शैलीमुळे DG मंजू यांनी उपस्थितांची मने जिंकली. शेवटी आगामी अध्यक्ष समीर प्रभुणे यांनी आभारप्रदर्शन केले. रो दिलीप आणि ॲन पद्मा पंडित यांनी आयोजित केलेल्या स्टार फेलोशिपचा आनंद सर्वांनी घेतला. या कार्यक्रमासाठी हॉल बुक करण्यापासून ते मेन्यू ठरवणे, पार्कींगची व्यवस्था बघणे, Strategic Planning Committee, BOD meeting आणि मुख्य मिटिंगची व्यवस्था बघणे, तसेच मिटिंग झाल्यावर सर्व सभासदांना कुठे काही कमी पडत नाही याची काळजी घेणे, ही सर्व कामे रो राजू बेल्लद यांनी पुर्णवेळ थांबून करुन घेतली. रो अभय यांनी नटून सजून आलेल्या सर्वांचे सुंदर फोटो काढले आहेत. पुढील काळात बऱ्याच जणांचे व्हॉटस् अप, फेसबुकचे डिपी/प्रोफाइलची सोय झाली आहे. रो नितीन यांनी आणलेल्या क्लब जॅकेटमुळे कात्रज क्लबचे सभासद उठून दिसत होते. कात्रज क्लबच्या सर्व सभासदांनी आपल्या घरचे कार्य समजून हिरीरीने सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात ८० पेक्षा जास्त सभासद उपस्थित होते. आपण सर्व बहुसंख्येने उपस्थित राहिल्याने डिजी मंजू यांनी विशेष कौतुक केले आहे. आपण रोटरी वर्षातील महत्वाचा टप्पा पार केला आहे. अशीच एकी, सहभाग, मदत आणि मार्गदर्शन करत हा जगन्नाथाचा रथ पुढे नेऊया. सर्व सभासदांचे धन्यवाद आणि आभार! सामाजिक बांधिलकी ही जाणीव दिवसेंदिवस वृध्दिंगत होवो ही सदिच्छा!

## 17 Feb – Valentine's Day Celebration



दि. १७ फेब्रुवारी रोजी क्लबच्या साप्ताहिक सभेत व्हॅलेंटाईन डे सेलेब्रेशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला अमानोरा मधील सामाजिक सेवेबद्दल श्री. अनिरूध्द देशपांडे यांच्यातर्फे देण्यात आलेल्या ट्रॉफी करिता रो विवेक कुलकर्णी यांचे कौतुक करण्यात आले. तसेच डिजी व्हिजिटच्या वेळेस पुर्ण वेळ थांबून मदत करणारे रो राजू बेल्लद यांचे आभार मानले. तसेच रो पुष्कराज, रो अभय आणि मदत करणाऱ्या सर्व सभासदांना धन्यवाद दिले. शुक्रवारी १६ फेब्रुवारी रोजी मुक्तांगणमध्ये विद्यार्थ्यांना Anger Management and Goal Setting ह्या विषयावर पुजा फाटक यांनी मार्गदर्शन केले, त्या बद्दल रो कलेश आणि रोट्रॅक्टर अक्षा यांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या पुढील भागात ॲनेट कुहू आणि रोट्रॅक्टर अक्षा यांनी क्लबमधील सभासदांसाठी विविध खेळ घेतले: प्यार–दोस्ती–दुश्मनी, साडीची घडी घालणे, मेणबत्ती लावणे व विझवणे, Dress me up, collect the items, know your spouse या सर्व खेळांमध्ये सर्व सभासदांनी खेळीमेळीने आनंद लुटला आणि भरपूर prizes मिळवले. या मिटिंगमध्ये नवीन प्रस्तावित सभासद श्री व सौ. संतोष शिंदे सहभागी झाले होते. आगामी अध्यक्ष रो समीर प्रभुणे यांनी आभारप्रदर्शन केले. रो पुष्कराज आणि वीणा मुळे यांच्या चविष्ट फेलोशिपने कार्यक्रमाची सांगता झाली.

## 24 Feb – DRT Meeting - Tambola




दि.२४ फेब्रुवारी रोजी क्लबच्या साप्ताहिक सभेत DRT Meeting अंतर्गत तंबोला हा कार्यक्रम घेण्यात आला. रोटरी डिस्ट्रिक्ट तर्फे DRT रो नाना पाटील आणि रो डॉ अभय सोनटक्के यांनी रोटरी Membership या विषयावर तंबोला कार्यक्रम घेतला. या कार्यक्रमात क्लबमधील उपस्थित सर्व सभासदांनी खेळीमेळीने सहभाग घेऊन कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला. यानंतर विजेत्या स्पर्धकांना डिस्ट्रिक्ट ऑफिसरच्या हस्ते बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमात नवीन होऊ इच्छित असलेले श्री व सौ शिंदे आणि श्री व सौ श्रोत्री उपस्थित होते. आभारप्रदर्शन रो अजय काळे यांनी केले. सभेच्या शेवटी नवीन सभासद रो राजीव आणि मिनाक्षी देशपांडे यांच्या फेलोशिपचा आस्वाद घेतला.

## 2 Feb – Disease Prevention & Treatment - General Checkup & Medicine Distribution Camp 5



General checkup & medicine distribution Camp 5 was conducted for 280 Amanora Park Town housekeeping/security/gardening/maids. Service Project Director Vivek Kulkarni was present along with President Milind. Checkup was done by doctors of Bharati Hospital and medicines (painkillers, vitamins, antibiotics, supplements) were distributed by Satya Sai Seva Sanghatana at Amanora Annapurna Canteen & Amanora Mall.

## 16 Feb – Youth - Session on Anger management & Goal setting



Session on Anger management & Goal setting was conducted by Pooja Phatak for Interact Club of Muktangan. The session was arranged with the help of Youth Director Kalesh Nerurkar & Rtr Aksha Kulkarni. Interact Coordinator teacher Nishu madam & Trupti Marathe were present. 35 students took the benefit of this program.

## 23 Feb – Youth - Learn Science through games



Mr Shivaji Mane conducted games through which basics of science can be learnt. All the students of Hiraman Bankar School enjoyed the program a lot. 200 students took the benefit of this program. The session was arranged with the help of Youth Director Kalesh Nerurkar & Secretary Asmita Patil. This activity was taken as Youth Development activity.

## 15 Feb – Public Image - Felicitation of our club by Aniruddha Deshpande for support to Service Projects






Felicitation of our club was done by Aniruddha Deshpande from Amanora Foundation for supporting their social activities. President Milind & PP Nitin Naik received it on behalf of our club. Service Project Director Vivek Kulkarni, IPP Namita, First Lady Mugdha & Ann Gouri attended the program.

## कविता – क्रिकेटीयर महेंद्रसिंग धोनी – रो. चित्रा कुलकर्णी

आखरी गेंद पार लगाया तुमने छक्का, देखनेवाले हुए हक्का बक्का ।
किया संघ का विजय पक्का, अनहोनी को होनी करता है धोनी ।
इकठ्ठे करते रेल टिकिट, पहूंच गये बल्ले के निकट ।
बल्लेने बनाया माहीको धनी, अनहोनी को होनी करता है धोनी ।
आये थे संघ में बनकर यष्टीरक्षक, अपने दम पर बन गये शांत संघनायक ।
दिलसे चाहता है तुम्हे हर एक हिंदुस्तानी, अनहोनी को होनी करता है धोनी ।
यश के नभ में उडता माही साक्षी ने पकडा, महेंद्रसिंग को प्रेमजाल में जकडा ।
आई जीवन में सुंदर झीवारानी, अनहोनी को होनी करता है धोनी ।
बीस षटको की जीत से खुदको किया महान, विश्वचषक जितकर देश कि बढाई शान ।
यही है तेरे खेलजीवन की कहानी, अनहोनी को होनी करता है धोनी ।

## कविता – डिस्ट्रिक्ट गव्हर्नर – रो. वर्षा हिरवे

प्रांतपालांची क्लबची भेट हा सालाना कार्यक्रम नेमाचा, अध्यक्ष आणि त्यांच्या संचालकांच्या सत्वर लगबगीचा।
रोटरी प्रांत ३१३१ च्या कळसावर आहे एक चांदणी, नाव तिचे मंजू जी आहे रोटेरिअन विश्वासची सहचारिणी।
सांप्रत रोटरी वर्षाच्या त्या आहेत मुख्यमंत्री, रोटरीतील कामांची आहे मात्र मोठीच जंत्री।
वाणीवर ठेवले आहे मंजूने साखरी प्रभुत्व, सर्वदूर पसरले तिचे चतुरस्त्र व्यक्तिमत्व।
शिक्षण विद्वत्ता बुद्धिमत्ता सर्वांचा सुरेख संगम, व्यावसायिक प्रशिक्षण देऊन केले बरेच सक्षम।
नवनवीन कल्पना राबवण्याची तिला खूप आवड, अथक दबडग्यातून मंजूला मात्र भरपूर सवड।
उदयन गुरु विवान ध्रुवम साकारी नूतन उपक्रमा, नक्षत्र कक्षा तेजोनिधी आणि तारांगणाची परिक्रमा।
विविध स्तरीय क्रीडांमध्ये तिचा आहे हातखंडा, गिर्यारोहण व कार रॅलीत मंजूचा वेगळाच फंडा।
पद्मश्री धारक आहेत द्रोणाचार्य गोपाळराव श्वशुर, कथ्थक नर्तिका लेक ईशा आहे सर्वत्र मशहूर।
तबला विशारद असतात त्यांचे जावई अंबर, अंतरा नातीचे कुटुंबात सदैव चैतन्यरुपी झुंबर।
रोटरी महागुरू बेस्ट एजी आदी पुरस्कार मिळवून मानाचे, रणरागिणी मंजूसमवेत आजचे मंथन क्लबच्या महत भाग्याचे।

## श्रीमंत – प्रेसिडेंट मिलिंद कुलकर्णी

मला नेहमी असं वाटायचं की जाम पैसा आला म्हणजे मनुष्य श्रीमंत होतो...
नंतर नंतर माझ्या लक्षात आलं पैसा आला की तो पैसेवाला नक्की होतो पण श्रीमंत होतोच असं नाहीये...
श्रीमंत या शब्दाची व्याख्या खुप मोठी आहे. वेदांमध्ये जी श्री नावाची देवता आहे ती लक्ष्मीपेक्षा थोडी निराळी आहे...
श्री या संज्ञेत पैसा,यश, सौंदर्य, श्रेष्ठत्व, अधिकार, प्रतिष्ठा, उद्योगशीलता, सुस्वभावीपणा वगैरे वगैरे अनेक गोष्टी त्यात अनुस्युत आहेत... फक्त पैसा नव्हे.
हे लक्षात आल्यावर मी आसपासच्या काही मंडळींचं निरिक्षण केलं आणि माझ्या लक्षात आलं की खरोखरंच यार पैसेवाला आणि श्रीमंत या दोन अत्यंत निरनिराळ्या कन्सेप्ट्स आहेत...
गंमत म्हणजे प्रत्येक श्रीमंत हा पैसेवाला होताच पण प्रत्येक पैसेवाला हा श्रीमंत नव्हता...
अनेक पैसेवाले असे आहेत की ज्यांना पैशाची फिकीर नाही...
अलोट आणि मुबलक पैसा आल्यावर त्या पैशाला शिस्तीचं वळण न लावल्यामुळे तो पैसा घरात लाथेलोटेसारखा असला तरी त्याला नियोजन नाही...
बेफिकीरी, व्यसनाधिनता, उधळपट्टी, वागणूकीत अहंकार, बेशिस्त अनेक पैसेवाल्यांकडे पदोपदी दिसली मला...
सगळीकडे झगमगाट होता पण त्या झगमगाटामागे दिखावा आणि माज होता...
मी किती महागाची स्कॉच पितो बघ हे सांगण्यामागे ब्रॅन्डच्या कौतुकापेक्षा, पैशाच्या लेबलला जास्त व्हॅल्यु होती...
ही खरेदी आणि बेफिकीरी घरातल्या इंटरिअरपासुन लहानशा खरेदीपर्यंत जिथेतिथे दिसते...
सुसंस्कृतपणा खुप कमी पैशेवाल्यांकडे आहे.
मुलं काय शिकतायत? यापेक्षा सगळ्यात भारी इंटरनॅशनल स्कूलमध्ये घातलंय याचंच वारेमाप कौतुक...
वाचनसंस्कृती, अभ्यासूपणा, विचारशीलता, सुसंस्कृतपणा याचा जिथेतिथे अभाव दिसत होता...
पण याउलट माझ्या परिचयातील कित्येक श्रीमंत मंडळी ही खुपच निराळी आहेत.
कुणाकडे स्वच्छतेची प्रचंड आवड तर कुणाकडे नेटकं आणि सुबक इंटेरिअर (अजिबात झकपक नाही),
कुणाला पुस्तकांचं कलेक्शन करुन त्याची सुबक लायब्ररी करण्याचा छंद तर कुणाला Antic मूर्त्या आणि चित्रं जमवायचा छंद...
कुणाला समाजसेवेची आवड तर कुणाला शेतीची हौस.
आणि गंमत म्हणजे सर्व श्रीमंत हे अतिशय Down to earth आणि सुसंस्कृत विचारांचे आहेत...
प्रत्येकाने संपत्तीचं उत्तम, Long Term नियोजन केलेलं आहे. रितसर कागदपत्रे, त्यांच्या फायली तयार आहेत. सरकारी करांचा भरणा व्यवस्थित केलेला असतो.
कुठेही कसलाही Show Off नाही आणि बडेजाव तर त्याहून नाही...
स्वत: केलेल्या समाजसेवेचं कौतुक तर अजिबात नाही.
कोट्याधीशाकडच्या पार्ट्यांसोबत गरीबाकडच्या सत्यनारायणालाही आवर्जुन जातात..
कुठेही कसलाही भेदभाव नाही, Attitude तर औषधालाही नाही...
उत्तम मोजकं आणि छान खाणं, भरपूर व्यायाम, सौंदर्याची निगा, मोजके पण सिलेक्टेड दागिने, अदबशीर बोलणं, वागणं... म्हणजे वेदातल्या श्री या संकल्पनेला अनुरुप असं परिपूर्ण श्रीमंत व्यक्तिमत्व ते हेच हो...
आणि मग माझ्या लक्षात आलं की एकतर भरपूर मेहनत करुन, कष्ट करुन, उद्योग करुन किंवा मग लांड्यालबाड्या करुन, जमिनी विकून पैसेवाला होता येणं कुणालाही सहज शक्य आहे पण श्रीमंत होणं हे एक कष्टसाध्य पण छान व सुंदर मिशन आहे...
पैसेवाल्यांना श्रीमंत होणं अशक्य आहे असं मी अजिबात म्हणणार नाही.
तो एक प्रवास आहे, विचारपुर्वक करण्याचा...तो करायलाच हवा.
तुमचं पैसेवालं असणं हे सगळ्यांच्या दृष्टीने जितकं हास्यास्पद आहे तितकंच श्रीमंत होणं कौतुकास्पद आहे हे लक्षात घ्या...
आपण खुप श्रीमंत व्हावे ही ईश्वरचरणी प्रार्थना...!!

पिंपळाच्या रोपासारखं ...
खडकावर उगवता आलं पाहिजे,
निर्भीडपणे निर्धाराच्या वाटेवर
चालता आलं पाहिजे.
वादळांचं काय....
ती येतात आणि जातात,
मातीत घट्ट पाय रोवून
उभं रहाता आलं पाहिजे.

आपण असे श्रीमंत व्हावे हीच मनोकामना !

## Painting by Mr Siddheshwar Palange




## Painting by Miss Vaidehi Kulkarni



## Heartiest Congratulations!

- **Rtn Rajeev Deshpande** passed the Geeta Jignasu Pathantar Pariksha of 12, 15 & 16th Adhyay.
- **Rtn Asmita V Patil** was felicitated by the District Governor Manjoo for contribution to District Conference Success.
- **Rtn Hemant Watwe** was invited as Eminent speaker for "The Leadership Mindset" program of D Y Patil University in "2nd Hon Har Bharat 2024" program.
- **Hon Rtr & Rtn Priyadarshini** is nominated for Best Actress award for her movie "Phulrani" for Ma Ta Sanman Puraskar.
- **Dr. Mahajan and Dr. Jayashree Mahajan** have completed 36 successful years of Mahajan Hospital.
- **PP Ram & Suvarna Kutwal's** Urja brand was featured in Sakal Newspaper as the Mahabrand.
- **Rtn Asmita Patil** was invited as the judge for Online Judging of TechFiesta-24 [P.I.C.T. Hackathon].

## जीवेद् शरदः शतम्




| | |
|---|---|
| Miss Simran Hatkar | 04 February |
| Mr Siddharth Shah | 11 February |
| PP Hemlata Bellad | 12 February |
| Rtn Varsha Hirve | 12 February |
| Mr Aryan Bajaj | 13 February |
| Ann Swati Watve | 13 February |
| Ann Ketki Sindekar | 15 February |
| Rtn Anil Kulkarni | 17 February |
| Mrs Pranjali Hugay Iyer | 18 February |
| Mr Aaroh Dinkar | 20 February |
| Ann Meenakshi Deshpande | 25 February |

## नांदा सौख्यभरे




| | |
|---|---|
| Rtn Uday & Aruna Gadkari | 01 February |
| PP Ajit & Suchitra Kulkarni | 14 February |
| PP Ramchandra & Chhaya Raut | 19 February |
| President Milind & Mugdha Kulkarni | 23 February |
| Rtn Nirmala & Bajirao Gulunjkar | 24 February |

## आगामी क्लब साप्ताहिक सभा कार्यक्रम

| Date | Program |
|---|---|
| 3 March | Rangoli – Songs Program at Sahajeevan Vruddhashram |
| 9 March | Women's Day Celebration |
| 16 March | New Member Orientation |
| 23 March | Holi Celebration |
| 30 March | Club Assembly 3 |


## Result of Weekly Quiz Competitions – Event Director Rtn Nukul Dinkar

**Quiz 1: About songs of/by Sudhir Phadake**

First Prize – Rtn Varsha Hirwe
Second Prize – Ann Chhaya Raut
Third Prize – PP Vibhakar Ramtirthkar

**Quiz 2: About marathi words ending with "ता"**

First Prize – Rtn Varsha Hirwe
Second Prize – PP Vibhakar Ramtirthkar
Third Prize – Ann Tanvi Thatte
Fourth Prize – Rtn Rajeev Deshpande
Fifth Prize – PP Vidya Patil
Sixth Prize – Ann Vinaya Kale




## Upcoming District Events… Reserve the dates

